नि.फौ.ख.क्र. १०७/२०२६ **नि.क्र. ०७**

शासन –वि.– प्रज्वल शेंडे

## <u>आरोपपत्र (फौ.व्य.सं.कलमे २२१, २२२, २२३)</u>

**<u>मी, एम.आर.चव्हाण–हिवराळे, न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, (२रे न्यायालय), वर्धा.</u>**

याव्दारे तुम्ही,

प्रज्वल राजु शेंडे,
वय – २५ वर्ष, व्यवसाय – मजुरी
राहणार – शेगांव (बुद्रुक), ता. वरोरा, जि. चंद्रपुर.

तुमच्यावर खाली दिल्याप्रमाणे आरोप ठेवते की :–

दिनांक २५/१०/२०२१ चे २३.०० ते दि. ३१/१०/२०२५ चे १३.०० वाजेच्या दरम्यान इसाफ स्मॉल फायनान्स बॅक, शाखा वर्धा येथे तुम्ही ग्राहक सेवा अधिकारी (सी.एस.ओ.) या पदावर नोकरीवर असतांना स्वतःचे अधिकाराचा गैरफायदा घेवुन कर्ज घेतलेल्या ग्राहकांची वसुली रक्कम बँकेत न भरता स्वतःकडे ठेवली, किस्त रकमेपेक्षा जास्त रक्कम वसुल केली व वसुलीची रक्कम ऑनलाईन पध्दतीने स्वीकारली, ग्राहकांना आवश्यकता नसतांना त्यांचे नावाने कर्ज मंजुर करून कर्ज प्राप्त रक्कम स्वतः कडे ठेवुन त्या सर्व रक्कमेचा स्वतःच्या आर्थिक फायदयाकरीता रूपये १४,११,९२१/– चा अपहार केला आणि त्याव्दारे तुम्ही भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३१६(५) अन्वये शिक्षेसपात्र गुन्हा केला, जो माझे अधिकार क्षेत्रात आहे.

वर नमुद तारीख, वेळी व दिवशी तुम्ही फिर्यादी/बँक व ग्राहकांचे खात्यातुन रक्कम काढून रक्कमेची अफरातफर करून ग्राहकांची व बँकेची फसवणुक व अप्रामाणिकपणे एकूण ४१ कर्जखात्यामधून १४,११,९२१/– रूपयांची अफरातफर केली आणि त्याव्दारे तुम्ही भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३१८(४) अन्वये शिक्षेसपात्र गुन्हा केला, जो माझे अधिकार क्षेत्रात आहे.

यात्दारे मी निर्देश देते की, उपरोक्त कलमान्वये तुमचेवर खटला चालविण्यात यावा.

MANGALA GAJANAN HIVARALE
Digitally signed by MANGALA GAJANAN HIVARALE
Date: 2026.04.28 16:01:08 +0530

(श्रीमती एम.आर.चव्हाण–हिवराळे)
दि. २८/०४/२०२६ न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
(२रे न्यायालय), वर्धा.

वरीलप्रमाणे आरोपीला दोष वाचून व समजावून सांगण्यात आला, त्याने तशा प्रकारचा गुन्हा केल्याचे नाकबूल केले व संपरीक्षेची मागणी केली.

MANGALA GAJANAN HIVARALE
Digitally signed by MANGALA GAJANAN HIVARALE
Date: 2026.04.28 16:01:14 +0530

(श्रीमती एम.आर.चव्हाण–हिवराळे)
दि. २८/०४/२०२६ न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
(२रे न्यायालय), वर्धा.